# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

वनवर्धन, प्रधान डाक घरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर -४१६ ००३

☎ कार्यालय - ०२३१/२६५३६३२, निवास -२६५३६३४, फॅक्स - २६५९२३३ E-mail – ccftkolhapur@gmail.com


**पत्र:ई-मेल**
**तात्काळ-महत्वाचे**

क्रमांक : कक्ष-४-४/आस्था/लिपीक/पदो-१४/२६७४
कोल्हापूर - ३. दिनांक :- ३० /७/२०१४

प्रति,

उपवनसंरक्षक, कोल्हापूर / सातारा / सावंतवाडी
विभागीय वन अधिकारी, सांगली / रत्नागिरी (चिपळूण)
उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
कोल्हापूर / सांगली /सातारा / रत्नागिरी / सिंधुदूर्ग

विषय :- लिपीकांना लेखापाल पदी पदोन्नती देणेबाबत....
संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/लिपीक/पदो-१३/४२०५, दि.२१/१२/२०१३.
२.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/लिपीक/पदो-१३/८५०, दि.३१/५/२०१४.
३.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/लिपीक/पदो-१४/२५८२, दि.१९/७/२०१४.

आपले लक्ष उपरोक्त संदर्भीय पत्रानंकडे वेधण्यात येत आहे. सदर पत्रान्वये लिपीकांना लेखापाल पदी पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करणेकरिता पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात येणाऱ्या लिपीकांची यादी पाठविण्यात आली आहे. आपले विभागातील संबंधीत लिपीकांची माहिती आस्थापना शाखेकडील लेखापाल/लिपीक यांचे सोबत या कार्यालयास पाठविणेस कळविले होते. आपले विभागातील लिपीकांचे गोपनीय अहवाल / इतर माहिती अद्याप प्राप्त झालेले नाहीत तरी ते तात्काळ या कार्यालयास सादर करावेत.

सोबत तक्त्यात दाखविले प्रमाणे आपले विभागाची माहिती अद्याप अप्राप्त आहे. संबंधीत माहिती आपले कार्यालयातील सेवापुस्तक व इतर अभिलख्यावरुन तपासून त्यामध्ये त्रूटी / तफावत असल्यास तात्काळ या कार्यालयास कळवावे. तक्त्यात दाखविल्या प्रमाणे अपूर्ण माहिती तात्काळ या कार्यालयास पाठवून द्यावी. **माहे ऑगस्ट २०१४ चे पहिल्या आठवडयात आपले विभागातील आस्थापना शाखेचे संबंधीत लेखापाल/लिपीक यांना सदर माहीतीची पडताळणी करुन घेणेसाठी या कार्यालयास पाठविण्यात यावे.** त्यानंतर दुसऱ्या आठवडयात पदोन्नती समितीची बैठक घेणेची असल्याने माहिती प्रथम प्राध्यान्याने दि.१०/८/२०१४ पर्यत या कार्यालयास पाठविण्याची दक्षता घ्यावी.

**सोबत : वरील प्रमाणे**

मुख्य वनसंरक्षक(प्रा),कोल्हापूर.

प्रतिलिपी : महासंचालक, कुंडल वन प्रशासकीय विकास व व्यवस्थापन प्रबोधनी, कुंडल यांना माहिती व वरीलप्रमाणे तत्सम कार्यवाहीसाठी सादर

प्रतिलिपी : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व वनसंशोधन तज्ञ, पुणे यांना माहिती व वरीलप्रमाणे तत्सम कार्यवाहीसाठी सादर

प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) कोल्हापूर यांना माहिती व वरीलप्रमाणे तत्सम कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :वनसंरक्षक, कार्यआयोजना विभाग, कोल्हापूर यांना माहिती व वरीलप्रमाणे तत्सम कार्यवाहीसाठी अग्रेषित.

स्वाक्षरित/-
मुख्य वनसंरक्षक(प्रा),कोल्हापूर.

प्रत: कक्ष-१/लेले निर्देशन विभाग यांना गोपनिय अहवाला संबंधी माहिती व कार्यवाहीसाठी.